# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः21.06.2024** **वारःशुक्रवार**

---

1. दहाव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचा देशभरात उत्साह
2. पंतप्रधानांच्या उपस्थितीत जम्मू आणि काश्मीरमध्ये श्रीनगर इथं थोड्याच वेळात योग दिनाचा मुख्य कार्यक्रम
3. देशाची संस्कृती समजून घेण्यासाठी लघुपट हे उत्तम साधन असल्याचं ज्येष्ठ दिग्दर्शक जब्बार पटेल यांचं प्रतिपादन आणि
4. टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारताचा अफगाणिस्तानवर 47 धावांनी विजय

**योग**

दहावा आंतरराष्ट्रीय योग दिन आज संपूर्ण देशभरात तसंच जगभरातल्या अनेक देशांमध्ये उत्साहानं साजरा होत आहे. "स्वतःसाठी आणि समाजासाठी योग" ही या वर्षीच्या योग दिवसाची मध्यवर्ती संकल्पना आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनाचा देशातला मुख्य कार्यक्रम जम्मू आणि काश्मीरमध्ये श्रीनगर इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत थोड्याच वेळात सुरू होत आहे. योग हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनवण्यासाठी वचनबद्ध रहा, आपल्याबरोबरच इतरांनाही यासाठी प्रोत्साहित करा, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योग दिनानिमित्त दिलेल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. दहाव्या आंतरराष्ट्रीय योग दिवसानिमित्त आज राज्यभरातही विविध उपक्रम आणि योग शिबिरांचं आय़ोजन करण्यात आलं आहे. भारतीय जनता पक्षानं उत्तर मुंबईत योग कार्यक्रमाचं आयोजन केलं असून या कार्यक्रमात केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल सहभागी होत आहेत.

**निर्मला सीतारमण**

केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी काल दुसरी अर्थसंकल्पपूर्व बैठक घेतली. आगामी अधिवेशनात 2024-25 या आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प सादर होणार आहे; त्या पार्श्वभूमीवर सीतारामन विविध तज्ज्ञांशी विचार विनिमय करत आहेत. पहिली बैठक गेल्या बुधवारी झाली होती. कालच्या बैठकीला केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी, वित्त सचिव, आणि मुख्य आर्थिक सल्लागार उपस्थित होते.

**वाढवण- मुंबई**

वाढवण बंदर प्रकल्प देशाच्या भविष्यासाठी अतिशय महत्वाचा प्रकल्प आहे; यामुळे राज्याच्या जीडीपीमध्ये एक टक्का वाढ होईल, असा विश्वास जेएनपीए अर्थात जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणचे प्रमुख उन्मेष वाघ यांनी व्यक्त केला. ते काल मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. कंटेनर वाहतुकीसाठी मुंद्रा आणि जेएनपीटी या बंदराची क्षमता कमी पडत आहे; त्यामुळे वाढवणसारख्या बंदराची गरज आहे, असं वाघ म्हणाले. वाढवण बंदरासाठी जमीन अधिग्रहित केली जाणार नाही, त्यामुळे पालघर भागातल्या लोकांचं विस्थापन होणार नाही. तसंच या प्रकल्पामुळे मच्छिमारांच्या व्यवसायावर कोणताही परिणाम होणार नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं. वाढवण बंदर प्रकल्प पर्यावरणपूरक प्रकल्प असून याद्वारे दहा लाख नोकऱ्या निर्माण होतील असंही वाघ यांनी सांगितलं.

**पुणे विमानतळ**

पुणे विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार करण्याबाबत केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांना पत्र लिहिलं आहे. तसंच धावपट्टी विस्तारासाठी सर्वेक्षण करण्याकरता भारतीय हवाई दलाला सूचना द्याव्यात, अशी विनंतीही केली आहे. या संदर्भात मोहोळ येत्या सोमवारी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेणार असल्याचं आमच्या वार्ताहरानं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे.

**नीट**

वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या नीट-पीजी परीक्षेची प्रश्नपत्रिका आणि आदर्श उत्तरपत्रिका प्रसिद्ध करण्याचे निर्देश राष्ट्रीय परीक्षा मंडळाला द्यावेत अशी मागणी करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने काल राष्ट्रीय परीक्षा मंडळ एनबीई आणि मेडीकल काऊन्सिलिंग कमिटीला नोटीसा जारी केल्या. न्यायालयाने प्रतिपक्षाकडून येत्या 8 जुलैपर्यंत प्रतिज्ञापत्र मागवली आहेत. पदवी अभ्यासक्रमासाठीच्या नीट परीक्षेसंदर्भात देशातल्या विविध उच्च न्यायलयांमधे दाखल झालेल्या याचिकांची सुनावणी एकत्रितपणे घेण्याबाबतही 8 जुलैलाच पुढची सुनावणी होणार आहे.

**मिफ-पुणे**

माहितीपट आणि लघुपटांना उत्तम भविष्य असून देशाची संस्कृती समजून घ्यायची असेल तर माहितीपट आणि लघुपट हे उत्तम साधन आहे, असं मत ज्येष्ठ दिग्दर्शक जब्बार पटेल यांनी काल पुण्यात व्यक्त केलं. 18व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील चित्रपट यंदा प्रथमच पुण्यातही प्रदर्शित करण्यात येत आहेत. त्या अंतर्गत राष्ट्रीय चित्रपट संग्राहालयात काल विविध मान्यवरांच्या उपस्थितीत चार्ली हेमलटॉन जेम्स दिग्दर्शित Billy and Molly: An Otter Love Story हा लघुपट दाखवण्यात आला; त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. यावेळी बोलताना ते म्हणाले .....

**शिवराज्याभिषेक**

शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या 351व्या वर्षारंभानिमित्त स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगडावर काल विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विविध मान्यवरांनी यात सहभाग घेतला. रायगडाबरोबरच राज्यातील विविध गड किल्ल्यांवरही काल शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त शिवप्रेमींनी गर्दी केली होती.

**निवृत्तीनाथ पालखी-नाशिक**

नाशिकच्या त्र्यंबकेश्वर इथून संत निवृत्तीनाथ महाराजांच्या पालखीचं आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे काल प्रस्थान झालं. साठ हजार वारकऱ्यांच्या उपस्थितीत संत निवृत्तीनाथ महाराज यांच्या नावाच्या जयघोषात ही पालखी मार्गस्थ झाली. प्रस्थानापूर्वी मनसे अध्यक्ष राज ठाकरे तसंच मंत्री दादा भुसे यांनीही पालखीचं दर्शन घेतलं. काल संध्याकाळी पालखी निवृत्तीनाथ महाराज यांचे गुरू गहिनीनाथ यांच्या गुरुगृही पंचायती महानिर्वाणी आखाडा, पेगलवाडी इथं पहिल्या मुक्कामी विसावली आहे.

**धुळे-रानमळा-पंढरपुर-दिंडी**

आषाढी एकादशीनिमित्त धुळे तालुक्यातील श्रीक्षेत्र रानमळा ते श्री क्षेत्र पंढरपूर पायी दिंडीला मोठ्या उत्साहानं काल सुरुवात झाली. टाळ, मृदुंगाच्या तालावर विठू नामाचा गजर करत ही दिंडी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाली. या

दिंडीचं यंदा 29 वर्षं आहे. दिंडीच्या माध्यमातून गावोगावी भजन, भारुड, कीर्तन तसेच प्रवचनाद्वारे समाज प्रबोधनाचे कार्य केलं जातं.

**<u>कोकणरेल्वे-नवीमुंबई</u>**

कोकण रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवल्याची माहिती कोकण रेल्वेचे व्यवस्थापकीय संचालक संतोष कुमार झा यांनी काल नवी मुंबईत वार्ताहरांना दिली. पावसाळ्याच्या कालावधीतील कोकण रेल्वे मार्गावर करण्यात येणाऱ्या उपाययोजना, तसंच कोकण रेल्वेच्या भविष्यातील विविध प्रकल्पांची माहिती यावेळी त्यांनी दिली.

**<u>कोल्हापूर-तिलारी घाट</u>**

कोल्हापूर जिल्ह्यात चंदगड तालुक्यात तसंच तिलारी घाटामध्ये पावसाळ्यामध्ये अतिवृष्टी आणि दरड कोसळण्याचा धोका लक्षात घेऊन घाट अवजड वाहतुकीसाठी 31 ऑक्टोबरपर्यंत बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी दिले आहेत.

**<u>क्रिकेट</u>**

आयसीसी टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत सुपर एटमधील सामन्यात काल भारतानं अफगाणिस्तानचा 47 धावांनी पराभव केला. बार्बाडोसमधील ब्रिजटाऊनच्या केन्सिंग्टन ओव्हल इथं झालेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारतानं अफगाणिस्तानसमोर 182 धावांचं आव्हान ठेवलं होतं, पण अफगाणिस्तानचा संघ निर्धारित 20 षटकांत केवळ 134 धावाच करू शकला. 28 चेंडूत 53 धावा करणारा भारताचा सूर्यकुमार यादव सामनावीर ठरला.

**<u>पाऊस</u>**

राज्याच्या विविध भागात काल पावसानं दमदार हजेरी लावली. मुंबई आणि उपनगरांत काल जोरदार पाऊस पडला. पालघर जिल्ह्यात काल झालेल्या पावसामुळे सूर्या, वैतरणा, देहर्जा नद्या ओसंडून वाहू लागल्या आहेत. अनेक रस्ते पाण्याखाली गेले होते. तसंच मनोर-वाडा भिवंडी रस्त्यावरील पर्यायी पूल पाण्याखाली गेल्यामुळे वाहतूक ठप्प झाली होती. पुण्यातही काल संध्याकाळी पावसाच्या जोरदार सरी बरसल्या.

**<u>हवामान</u>**

येत्या 24 तासात कोकण आणि विदर्भात बहुतेक ठिकाणी पाऊस पडेल असा अंदाज आहे. किनारपट्टीच्या भागात सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी विजांसह पावसाचीही शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.